महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in


कमांक / पुविमं / उ.मा / प्रात्य. / पी.1 / पी.2 | 3380
दि. 04 / 07 / 2024

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,

सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,

(जिल्हा–पुणे, अहमदनगर, सोलापूर)

विषय– माध्यमिक शालांत प्रमाणपपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा जुलै–ऑगस्ट 2024 च्या पुरवणी परीक्षेच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत....

संदर्भ– 1. राज्यमंडळ कार्यालयाचे जा.क.रा.मं. / परीक्षा–6 / 2128 दि.03.06.2024 चे पत्र
2. राज्यमंडळ कार्यालयाचे जा.क.रा.मं. / परीक्षा–6 / 2495 दि.24.06.2024 चे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, जुलै–ऑगस्ट 2024 मध्ये घेण्यात येणा–या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा खालील नमुद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे.

- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी)

| अ.क. | परीक्षेचा तपशील | परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| 1. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी) प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | मंगळवार, दि. 16 / 07 / 2024 ते शनिवार, दि.03 / 08 / 2024 |
| 2. | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासकम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |

- प्रात्यक्षिक परीक्षेच्या तारखा (इ.10 वी) खालीलप्रमाणे.

| अ.क. | परीक्षेचा तपशील | परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| 1. | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी) प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | मंगळवार, दि. 16 / 07 / 2024 ते मंगळवार, दि.30 / 07 / 2024 |
| 2. | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासकम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| 3. | शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार, दि. 16 / 07 / 2024 ते शुकवार, दि. 26 / 07 / 2024 |
| 4. | दिव्यांग विदयार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | |

**माध्यमिक शालांत प्रमाणपपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा जुलै–ऑगस्ट 2024 च्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी खालील सुचनांनुसार कार्यवाही करावी–**

- (इ.10 व व इ.12 वी )जुलै–ऑगस्ट 2024 परीक्षेसाठी प्रचलित पध्दतीनुसार केंद्रावर घेतली जात होती. तथापि त्यामध्ये बदल करण्यात येवून ती प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा संबंधित शाळा व कनिष्ठ महाविदयालयामध्ये घेण्यात यावी. याबाबत संदर्भ– पत्र क.रा.मं. /परीक्षा–2/5508 दि.26/12/2023 नुसार सर्व शाळा व कनिष्ठ महाविदयालयांना कळविण्यात आले होते.
- प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मुल्यमापनाचे गुण फेब्रुवारी–मार्च 2024 परीक्षेप्रमाणेच **OMR Sheet** ऐवजी **Portal** वर ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत. याबाबतची **LINK** आपणांस यथावकाश कळविण्यात येईल.
- परीक्षेचा कालावधी मर्यादित असल्याने या परीक्षेसाठी प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी, आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा **Out of Turn ने आयोजित करण्यात येणार नाही.** तरी विदयार्थी संख्येनुसार शाळा व कनिष्ठ महाविदयालयामध्ये निर्धारित कालावधीत प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षा/श्रेणी परीक्षा घेण्याबाबत तसेच संबंधीत विदयार्थ्यांना त्यांचा परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपूर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी मिळेल याची दक्षता सर्व शाळा व क. महाविद्यालय प्रमुखांनी घ्यावी. या परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.
- प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षक म्हणून ज्या त्या शाळा व कनिष्ठ महाविदयालयातील शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.
- इ.12 वी माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयाचे परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात यावी. सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा कनिष्ठ महाविद्यालयातील संगणकाची मर्यादित संख्या लक्षात, घेता एकाच वेळी घेणे शक्य नसल्याने ती गटागटामध्ये घेण्यात यावी. यासाठी वेळापत्रकात प्रत्येकी दोन सत्र देण्यात आले आहे.
- सर्व महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपूर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वीच विद्यार्थ्यांना अवगत होईल, याबाबत दक्षता घ्यावी.

❖ *इ. 12 वी साठी गुणतक्ते व उत्तरपत्रिकांबाबतच्या सूचना*

सर्व विषयांच्या गुणतक्ते व उत्तरपत्रिका स्वतंत्र पाकिटात सादर करणे.

- *ऑनलाईन गुणतक्ते हे उत्तरपत्रिकांच्या पाकिटात घालून पाठवू नयेत.*
- *ऑनलाईन गुणतक्ते, हजेरी व गैरहजेरी अहवाल गुणतक्त्याच्या पाकिटात भरणे.*
- *सर्व प्रात्यक्षिक विषयांच्या उत्तरपत्रिका विषयनिहाय बांधून एकाच पाकिटे भरणे.*
- *सर्व पाकिटांवर कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक कमांक व विषय कोड नमूद करावे.*

| अ.क्र. | गुणतक्ते भरावयाचे विषय | वापरायाचे पाकीट |
|---|---|---|
| 1. | प्रात्यक्षिक परीक्षेच्या सर्व विषयांचे ऑनलाईनचे गुणतक्ते | नवीन दिलेले निळया रंगाचे पाकीट (प्रात्यक्षिक शाखा पी–2) |
| 2. | प्रात्यक्षिक विषय उत्तरपत्रिका | खाकी रंगाचे पाकीट (प्रात्यक्षिक शाखा पी–2) |
| 3. | • भाषा विषय (तोंडी) ऑनलाईन गुणतक्ते<br>• पर्यावरण गुणतक्ते, आरोग्य व शारिरीक शिक्षण विषयाचे श्रेणीतक्ते | स्वतंत्र गुलाबी रंगाचे पाकीट (परीक्षा शाखा– अ) |

*कोणत्याही परिस्थितीत गुणपत्रिका व प्रात्यक्षिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका व इतर साहित्य पोस्टाने पाठवू नये.*

**माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा जुलै–ऑगस्ट 2024 प्रात्यक्षिक साहित्य वाटप व संकलनाचे दिनांक व वेळ खालीलप्रमाणे–**

| अ. क्र. | जिल्हा | साहित्य वाटपाचा दिनांक | साहित्य संकलनाचा दिनांक | वाटप व संकलनाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1. | पुणे | 09 / 07 / 2024<br>स.11.00 ते दु.04.00 | 05 / 08 / 2024<br>स.11.00 ते दु.04.00 | पुणे विभागीय मंडळ कार्यालय<br>पुणे जिल्हयातील सर्व तालुके |
| 2. | अहमदनगर | 09 / 07 / 2024<br>स.11.00 ते दु.04.00 | 05 / 08 / 2024<br>स.11.00 ते दु.04.00 | 1. ए.ई.सो. चे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, अहमदनगर (अ.नगर, पारनेर, पाथर्डी व शवगाव)<br>2. महात्मा गांधी विद्यालय, कर्जत जि. अहमदनगर (कर्जत, जामखेड व श्रीगोंदा)<br>3. भाऊसाहेब गुंजाळ पाटील सहयाद्री विद्यालय, ता.संगमनेर, जि. अहमदनगर(संगमनेर व आकोले)<br>4. के. जे. सोमय्या हायस्कूल, श्रीरामपूर, जि.अहमदनगर (श्रीरामपूर, कोपरगांव, राहूरी, नेवासा व राहाता) |
| 3. | सोलापूर | 09 / 07 / 2024<br>स.11.00 ते दु.04.00 | 05 / 08 / 2024<br>स.11.00 ते दु.04.00 | 1. छत्रपती शिवाजी प्रशाला, मुरारजीपेठ, जि. सोलापूर (सोलापूर, अक्कलकोट व माहोळ)<br>2. सुलाखे हायस्कूल, बाळेश्वर मंदिराजवळ, बार्शी, जि.सोलापूर (बार्शी, माढा व करमाळा)<br>3. कर्मवीर भाऊराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय, मु.पो.ता. पंढरपूर, जि.सोलापूर (पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस व सांगोला) |

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005